दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • बुधवार दि.११ मार्च २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १९४ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Wednesday 11 March 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 194 • Pages 4 • Rate 4 Rs


### रील स्टार अरुण तुपेचे अकाली निधन

**मुंबई–**छत्रपती संभाजीनगरचा लोकप्रिय रील स्टार अरुण तुपेचे आज सकाळी निधन झाले आहे. बालाजी नगर येथील त्याच्या घरी सकाळच्या सुमारास मृतावस्थेत आढळून आला. अरुणच्या अकाली निधनाने सोशल मीडियावर हळहळ व्यक्त केली जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, अरुण तुपे सकाळी त्याच्या कुटुंबीयांना अत्यंत गंभीर अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. मात्र, अरुणचा मृत्यू कशामुळे झाला याचे कारण अद्याप समजू शकले नाही.इन्स्टाग्रामवर अरुण तुपेने मृत्यूच्या २२ तास आधीच एक रील शेअर केली होती. तसेच त्या रीलवरील कमेंट्सला तो रिप्लाय देखील देत होता. त्यामुळे अचानक असे काय घडले ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला, हे कारण अद्याप समजू शकले नाहीये. संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात त्याच्या मृतदेहावर शवविच्छेदन करण्यात आले.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांची राज्यातील शासकीय नोकर भरतीसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी शुल्क कमी करण्याची मागणी

## परीक्षा केंद्रांपासून दूर असलेल्या विद्यार्थ्यांना बस व रेल्वे प्रवासावर सूट द्यावी

## आ.सुधीर मुनगंटीवार यांनी नोकर भरती प्रक्रियेतील अडचणींवर मांडला प्रगल्भ दृष्टिकोन

**मुंबई (प्रतिनिधी)–राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत राज्यातील शासकीय नोकर भरतीसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी शुल्क कमी करण्याची मागणी केली. राज्यातील शासकीय नोकर भरती प्रक्रियेत शुल्कवृद्धीच्या मुद्द्यावर ते बोलत होते.अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय परीक्षांतील शुल्क ५० टक्के कमी करणे अत्यंत आवश्यक आहे.यासोबतच, समाजातील प्रत्येक घटकातील गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शासकीय नोकऱ्यांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी समान संधी मिळाव्यात, म्हणून शुल्क कमी करणे आणि अन्य आर्थिक सहाय्य देणे आवश्यक आहे, असा मुद्दा आमदार श्री. मुनगंटीवार यांनी उपस्थित केला.**



परीक्षा केंद्रांपासून लांब राहणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्रावर पोहोचताना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ३०० ते ३५० किलोमीटरवर असलेल्या परीक्षा केंद्रांवर पोहोचण्यासाठी विद्यार्थ्यांना बस व रेल्वे प्रवासात सूट दिली जावी. यासाठी 'एक्झाम सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' नावाचा उपक्रम राबवावा, असेही आ. मुनगंटीवार यांनी सभागृहात सूचवले.आ. मुनगंटीवार यांनी उडठ निधीचा वापर गरीब विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी करण्यात यावा अशी सूचना केली. राज्यात उपलब्ध असलेल्या सव्वा दोन लाख रिक्त पदांची भरती प्रक्रिया लांबणीवर पडणे तसेच किचकट प्रक्रियेची समस्या देखील त्यांनी मुद्देसूद मांडली. 'विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून या प्रक्रियेत सुधारणा करावी. परीक्षेसाठी पाच वर्षांसाठी एक पूर्वनिर्धारित वेळापत्रक तयार करण्याची गरज आहे. त्यामुळे वेळेची बचत होईल आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे तयारी करता येईल, असेही आ. श्री. मुनगंटीवार म्हणाले. मंत्री आशिष शेलार यांनी यावर सकारात्मक उत्तर देत, अन्य राज्य आणि केंद्र सरकारच्या परीक्षा प्रक्रियांचा अभ्यास करून लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

## केज-मांजरसुंबा महामार्गावर दोन कारची समोरासमोर धडक;पाच जण जखमी




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज-मांजरसुंबा महा मार्गावरील उमरी पाटी व गंगामाऊली साखर कारखान्याजवळ दोन कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात दोन्ही वाहनांतील एकूण पाच जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहिती नुसार,मंगळवार दि.१० मार्च मंगळवार रोजी दुपारी सुमारे १२-०० वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला.माजी सैनिक मधुकर बालासाहेब गायकवाड रा.चिंचोली माळी हे रिलायन्स पवन ऊर्जा कंपनीत सुरक्षा रक्षक सुपरवायझर म्हणून कार्यरत असून ते त्यांचे सहकारी सिद्धेश्वर आदमाने यांच्या सह स्विफ्ट डिझायर क्र. MH-44 S-7432 कारने बीड कडे जात होते.त्याच वेळी बीडकडून केजकडे येणाऱ्या टाटा अल्ट्रॉस क्र.MH-23 BH-6566 कारची आदित्य बिअर बार समोर स्विफ्ट डिझायर कारशी समोरा समोर जोरदार धडक झाली.धडक इतकी भीषण होती की,दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून रस्त्यावर काही काळ वाहतूकही विस्कळीत झाली होती.

या अपघातात शिवराज रविंद्र माने वय ३३ रा. बीड,रवि संतराम शिंदे वय ३३,रा.बीड,अनिल आत्माराम मोरे वय ३२, रा.बीड,सिद्धेश्वर देवसन आदमाने वय २० रा.बीड व मधुकर बालासाहेब गायकवाड वय ५४ रा. चिंचोलीमाळी हे पाच जण जखमी झाले आहेत.सदरील अपघाताची माहिती मिळताच केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, प्रल्हाद चव्हाण,जमादार गित्ते,संतोष गित्ते, शिवाजी कागदे व इतर कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. रुग्णवाहिका चालक सुमित तेलंग यांच्या मदतीने जखमींना तातडीने केज येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.दरम्यान,या प्रकरणी पुढील तपास केज पोलीस करीत आहेत.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिना निमित्त जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेत आदर्श राजमाता जिजाऊ माँसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले,त्यागमुर्ती रमामाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे प्रातिनिधिक स्वरूपात शाळा व्यवस्थापनसमिती अध्यक्षा सौ.शालु विजय थोरात,सौ.निर्मलामधुकर थोरात,विमल अभिमान पटेकर,फातेमा पठाण, अपग्रेड मुख्याध्यापक श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हापरिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी केले.प्रत्येक पुरुषांनी महिलांचा आदर करुन मानसन्मान केला पाहिजे असे कर्तृत्ववान आदर्श राजमाताजिजाऊ माँसाहेब,क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, त्यागमुर्ती रमामाई आंबेडकर अशा अनेक महिलांनी कर्तृत्व केले. थोर पुरुषांना स्त्रियांनी त्यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्याचे काम केल्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले.महामानव



डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांसाठी कार्य केले.महात्मा फुलेंची समाज उन्नतीसाठी कार्य केले.अशा अनेक थोर महापुरुषांना त्यांच्या कार्यास महिलांनी साथ दिली.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. प्राथमिक पदवीधर डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर,गणित विज्ञान विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री. संदीप मेघराज ठोंबरे सर, श्री.राहुल बजरंग बचुटे सर,श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम, श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनी जागतिक महिला दिना निमित्त सविस्तर माहिती दिली.गावातील कर्तृत्ववान,आदर्श महिलांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.संगीत खुर्ची,गीत गायन,उखाणे, बेटी बचाव बेटी पढाओ असे विविध उपक्रम शाळेत घेण्यात आले. बालविवाह प्रतिबंधक शपथ घेऊन बालविवाह प्रतिबंधक बाबत सविस्तर माहिती दिली. अल्पोपहार व चहापाणी देऊन श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आदर्श शिक्षक श्री. आकाश दत्तात्रय लोंढे सर यांनी केले.या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ.शालु विजय थोरात,सौ.निर्मलामधुकर थोरात,सौ.सुवर्णमाला नानासाहेब पवार,सौ. अनिता सिध्देश्वर पवार, सौ.नंदिनी अविनाश थोरात,राधा संतोष ढोरे, विमल अभिमान पटेकर, फातेमा पठाण,मिरा सुरेश थोरात,अंगणवाडी ताई उषाताई थोरात, मदतनीस,पीएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार,गावातील बचत गट महिला,विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

## मांजरा धरणातील कोळंबी व मासोळी पकडण्यासाठी कुशल मच्छीमारांनी संपर्क साधावा-चेअरमन लक्ष्मण सोनवणे



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मांजरा प्रकल्पातील कोळंबी व मासोळी पकडण्यासाठी बाहेरील कुशल मच्छीमार यांनी संपर्क साधावा असे आवाहन मांजरा प्रकल्प मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित धनेगांवचे चेअरमन लक्ष्मण पांडुरंग सोनवणे यांनी केले आहे. त्यांनी प्रसिध्दीसाठी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की,यंदा जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाला आहे त्यामुळे मांजरा जलाशय मध्ये मागील वर्षीची कोळंबी व चालू वर्षात मासोळी संचयन केले आहे.सदर कोळंबी व मासोळी पकडण्यासाठी बाहेरील कुशल मच्छीमाराने संस्थेकडे संपर्क साधावा असे आवाहन लक्ष्मण सोनवणे यांनी केले असून या दरम्यान शासनाच्या धोरणानुसार प्रति किलो योग्य मोबदला दिला जाणार आहे असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात मांजरा प्रकल्प मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित धनेगांवचे चेअरमन लक्ष्मण पांडुरंग सोनवणे यांनी केले आहे.तरी कुशल मच्छीमारांनी त्वरीत संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

## ट्रॉसिटी आणि विनयभंगाच्या खटल्यातून आरोपींची निर्दोष मुक्तता

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील आरोपीची जिल्हा व सत्र न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. या खटल्यात भारतीय दंड संहिता (IPC) कलम ३५४, ५०४, ५०६ आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ च्या कलम ३(१)(आर), ३(१)(एस) व ३(२)(व्हीए) या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता.

प्रकरणाची माहिती:
संबंधित प्रकरणात आरोपी संदीप सुदाम कदम रा. खापर पांगरी ता. जिल्हा.बीड विरुद्ध आरोप लावण्यात आले होते. सबल पुराव्याअभावी मे दुसरे जिल्हा व सत्र





न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता केली.
कायदेशीर यश:
या खटल्यात आरोपी वतीने सुभाष आर काळे यांनी मुख्य बाजू मांडली. त्यांना या कायदेशीर लढाईत ड. शेख सद्दाम शेख इस्माईल आणि आदर्श अरुणराव जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या वकिलांच्या टीमने केलेल्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपीला न्याय मिळाला आणि त्यांची निर्दोष मुक्तता झाली.




# संपादकीय

## विजयाचा अश्वमेध



न्यूझीलंडवर एकतर्फी मात करून भारतीय क्रिकेट संघाने टी-ट्वेंटी विश्वकरंडकावर सलग दुसऱ्यांदा नाव कोरले आहे. टी-ट्वेंटी प्रकारात सलग दोन विजेतेपदे, एक दिवसीय क्रिकेट स्पर्धेतील (चॅम्पियन्स करंडक) विजेतेपद, १९ वर्षांखालील विश्वकरंडक जेतेपद आणि महिला संघाने विश्वकरंडकाला घातलेली गवसणी... ही गेल्या अठरा महिन्यांतील कामगिरी क्रिकेटमधील भारताचे वर्चस्व दाखविणारी आहे. खेळात मोठी गुंतवणूक, प्रतिभावानांचा शोध व संधी, पोषक वातावरण, खेळाची बाजारपेठ विकसित करणे असे सगळे केल्यास यशोमालिका कशी निर्माण होते, हे भारताने क्रिकेटबाबतीत दाखवून दिले आहे. विश्वकरंडक विजेतेपद किंवा द्विपक्षीय सामन्यांतील विजय भारताला नवीन नाहीत; परंतु विजयांची सवय लागून त्यांची एक मालिकाच करण्याचा प्रकार हा गेल्या काही वर्षांतला. कोणा एका खेळाडूवर अवलंबून न राहता सांघिक कामगिरीवर भर देऊन विजय मिळविण्यासाठीच मैदानात उतरण्याची वृत्ती भारतीय संघात आता निर्माण झाली आहे. रविवारचे विश्वविजेतेपद हे त्याचेच आणखी एक द्योतक. या स्पर्धेत यजमान म्हणून विजय मिळवताना भारताने इतिहास घडविला. त्याचे श्रेय संपूर्ण संघ, कर्णधार सूर्यकुमार, मार्गदर्शक गौतम गंभीर आणि संघ व्यवस्थापन यांचे; परंतु संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, ईशान किशन, जसप्रीत बुमराह हे विजयाचे शिल्पकार म्हणता येतील. सारा देश आज या विजयाचा जल्लोष साजरा करीत असला, तरी हे एका रात्रीत मिळवलेले यश नव्हे. भारतीय संघातील अनेक खेळाडूंच्या कष्टांमधून गेल्या काही वर्षांत हे सुवर्णक्षण अनुभवण्याची संधी कोट्यवधी भारतीयांना वारंवार मिळत आहे.या संपूर्ण स्पर्धेत, विशेषत: स्पर्धेच्या उत्तरार्धात भारतीय संघातील खेळाडूंनी केलेला खेळ पाहिला, तर या विश्वकरंडकावर केवळ भारताचाच हक्क होता, असे म्हणावे लागेल. एखादा सामना वगळता भारतीय खेळाडूंनी जवळपास प्रत्येक सामन्यावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. अंतिम सामन्यातही त्याचेच प्रत्यंतर आले. न्यूझीलंडची गोलंदाजी पूर्णपणे निष्प्रभ ठरवून भारतीय फलंदाजांनी २५५ धावांचा डोंगर रचला होता; मात्र टी-२० मध्ये अडीचशे धावा, या नव्या पिढीतील आक्रमक फलंदाजांसाठी जणू नित्याच्या बनल्या आहेत. त्यामुळेच न्यूझीलंड हे लक्ष्य पार करू शकेल, अशी धाकधूक होती. मात्र, जसप्रीत बुमराह, हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांनी न्यूझीलंडला रोखले आणि विजयात आक्रमक फलंदाजीइतकाच वैविध्यपूर्ण गोलंदाजीचाही वाटा असतो, हे पुन्हा दाखवून दिले. संजू सॅमसनला या स्पर्धेत सूर गवसला आणि अखेरच्या तिन्ही सामन्यांत याच सुरात भारताचेही विजयगान साकारले. काही काळापूर्वी संजूची कामगिरी सर्वसाधारण म्हणावी अशीच होती; परंतु प्रचंड कष्ट आणि आजी-माजी खेळाडूंकडून मार्गदर्शन घेऊन त्याने केलेली चमकदार कामगिरी अनेकांना निराशेतून बाहेर पडण्याची प्रेरणा देणारी ठरेल. गेल्या काही काळापासून खेळाडूच्या वैयक्तिक कामगिरीपेक्षाही संघाचा विजय, हे एकमेव ध्येय समोर ठेवण्याचे धोरण सातत्याने सगळ्या खेळाडूंच्या मनावर बिंबवल्याने प्रत्येकाने या विजयात वाटा उचलला. त्यामुळे संपूर्ण संघच 'स्टार' ठरला, हे मान्य करावे लागेल.या स्पर्धेपूर्वी बांगलादेशच्या खेळाडूला वगळणे आणि नंतर बांगलादेशाचे स्पर्धेतून बाहेर पडणे, या घटनाक्रमाने स्पर्धेला वेगळे वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यातच पाकिस्ताननेही भारताशी न खेळण्याचा पवित्रा घेऊन स्पर्धेला अपशकुन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, 'आयसीसी'ने कौशल्याने परिस्थिती हाताळल्याने पेच टळला आणि पुढील स्पर्धा निर्विघ्नपणे पार पडली. मात्र, ग्रहणकाळात सराव न करणे किंवा पूर्वीचे हॉटेल बदलणे यांसारखे प्रकार नव्या काळात खचितच शोभणारे नाहीत. कौशल्य आणि मेहनतीच्या बळावरच जय-पराजयाला सामोरे गेले पाहिजे, हे लक्षात घ्यावे लागेल. टी-२०च्या शैलीवर भारतीयांचे वर्चस्व निर्माण होण्याचे श्रेय इंडियन प्रीमिअर लीगला (आयपीएल) द्यावे लागेल. या प्रकारच्या क्रिकेटमध्ये शास्त्रशुद्ध खेळाला दुय्यम स्थान असल्याने दोन दशकांपूर्वी भारतात याचे आगमन झाले, तेव्हा त्याबाबत काहीशी नाके मुरडण्यात येत होती. मात्र, महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने टी-२०चा वर्ल्ड कप जिंकला; पाठोपाठ 'आयपीएल'ने त्याचे रंजनमूल्य आणि आर्थिक लाभ जगाच्या लक्षात आले आणि साऱ्या जगाच्या क्रिकेटचा चेहरामोहराच पालटून गेला. प्रत्येक सामन्यात चौकार-षटकारांची आतषबाजी आणि प्रचंड वेगवान खेळ आता क्रीडारसिकांच्या पसंतीस उतरला आहेच. 'आयपीएल'ने देश-विदेशातील नव्या पिढीतील गुणवत्तेला जगाचे व्यासपीठ खुले करून दिले असून, भारतालाही क्रिकेटची महासत्ता बनवले आहे. क्रिकेटचा हा कित्ता अन्य खेळांसाठी गिरवून देशात क्रीडासंस्कृती रुजवायला हवी.

# नंदुरबारच्या लेकींची गरुडझेप: कात्रीतील महिला उद्योगाला सरकारचे 'बळ'!

## आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांची सूर्यदर्शन शेतकरी प्रोड्युसर कंपनीला भेट; सिताफळ पल्पिंग आणि अझोला प्रकल्पाचे केले कौतुक

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

दुर्गम भागातील आदिवासी महिलांनी एकत्र येऊन सुरू केलेल्या उद्योगाला आता थेट राज्य सरकारची भक्कम साथ मिळाली आहे. नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील कात्री येथील 'सूर्यदर्शन शेतकरी प्रोड्युसर कंपनी' च्या उपक्रमांची पाहणी करण्यासाठी राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉक्टर अशोक उईके यांनी प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी त्यांनी महिला बचत गटांच्या जिद्दीचे कौतुक करत, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे ग्वाही दिली.ग्रामीण भागातील महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजना प्रभावीपणे राबवण्याचे निर्देश मंत्री उईके यांनी प्रशासनाला दिले. या योजनेची व्याप्ती स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की:वैयक्तिक लाभांतर्गत पात्र महिलांना ५० हजार रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य.

महिला बचत गटांना ७ लाख ५० हजार रुपयांपर्यंत



मोठी मदत.

राज्य स्तरावर या योजनेसाठी तब्बल १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

मंत्री महोदयांनी सूर्यदर्शन कंपनीच्या सिताफळ पल्पिंग युनिटला भेट देऊन सविस्तर माहिती घेतली. स्थानिक पातळीवर उत्पादित होणाऱ्या सिताफळावर प्रक्रिया करून त्याचा पल्प शीतगृहात साठवला जातो. या पल्पपासून सिताफळ आईस्क्रीम आणि कुल्फी तयार केली जाते. आदिवासी भागातील कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन करण्याचा हा प्रयोग 'नंदुरबार पॅटर्न' म्हणून समोर येत आहे. तसेच, पशुखाद्यासाठी उपयुक्त असलेल्या अझोला प्रकल्पाचीही त्यांनी बारकाईने पाहणी ककेली

यावेळी आमदार आमश्या पाडवी, आमदार राजेश पाडवी, आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा, जिल्हाधिकारी डॉक्टर मिताली शेट्टी, प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार, कृषी तज्ज्ञ डॉक्टर राजेंद्र दहातोंडे, जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आदिवासी महिलांना केवळ रोजगाराच्या संधी देणे एवढेच आमचे ध्येय नसून, त्यांना स्वावलंबी बनवून समाजात मानाचे स्थान मिळवून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे.असे डॉक्टर अशोक उईके यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कंपनीच्या अध्यक्षा अनिता वळवी, सचिव अरुणा वळवी, संचालक शिवा वळवी, संदीप वळवी, सुभाष पाडवी आणि उएज उदेसिंग पाडवी यांच्यासह नथमल पटले, रविंद्र पाडवी आणि सर्व महिला बचत गटांच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कात्री परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने या सोहळ्याला उपस्थित होते.

# माजलगावात सराफ सुवर्णकार असोसिएशनचा भव्य मार्गदर्शन मेळावा

## पोलीस अधिकारी यांचा कर्तव्यदक्षता आणि जनसेवा गौरव सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

सराफ सुवर्णकार समाजातील व्यापारी व कारागिरांना कायदेशीर मार्गदर्शन मिळावे तसेच कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने सराफ सुवर्णकार असोसिएशन, माजलगाव यांच्या वतीने खझउ ४११ / इछड ३१७ संदर्भात भव्य मार्गदर्शन मेळावा व कर्तव्यदक्षता आणि जनसेवा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता शाहू नगर, माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक नवनित कांवत व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड तसेच त्यांच्या संपूर्ण पथकाचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ



यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगावचे आमदार प्रकाश (दादा) सोळंके राहणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजेशजी रोकडे (चेअरमन - ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिल), तर

यावेळी प्रमुख उपस्थितीत माजी आमदार राधाकृष्ण आण्णा होके, आ. विजयसिंह पंडित, ओमप्रकाश शेटे, मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, ग्रामीण पोलीस निरीक्षक बालक कोळी, शिवाजी रांजणव उमेश मोगरेकर तुकाराम येवले कल्याण आबुज पांडुरंग उगले प्रभाकर कुलथे यांच्यासह जिल्ह्यातील विविध व्यापारी संघटना व सुवर्णकार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तसेच सचिन अंबिलवादे, गणेश बेद्रे (सुवर्णकार फेडरेशन), माधव निर्मळ (उद्योजक, बीड), मंगेश लोळगे, आनंत दादा रुद्रवार, संतोष शेठ सोहनी आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. व कायदे सल्लागार अँड .दिपक देशमुख यांचे कायदेशीर मार्गदर्शन होणार आहे या कार्यक्रमाचे आयोजन सराफ सुवर्णकार असोसिएशन माजलगावचे अध्यक्ष रामराजे रांजवण, सचिव गजानन बोकन, उपाध्यक्ष नारायण सातपुते यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.समस्त सराफ सुवर्णकार बांधवांनी या मार्गदर्शन मेळाव्यास उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# खारघर येथे महिला दिनानिमित्त 'गती मॅरेथॉन'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत आमदार विक्रांतदादा पाटील प्रतिष्ठान आणि जान्या फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर येथे 'गती मॅरेथॉन २०२६'चे भव्य आयोजन करण्यात आले. ८ मार्च रोजी सकाळी या मॅरेथॉनमध्ये सहभाग नागरिकांनी मोठा सहभाग घेतला पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या या मॅरेथॉनला खारघर तसेच नवी मुंबई परिसरातील क्रीडाप्रेमी, युवक-युवती, महिला आणि लहान मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती करणे आणि स्तन व गर्भाशय मुख कर्करोगाबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे हा या मॅरेथॉनचा मुख्य उद्देश होता. महिलांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहावे आणि नियमित तपासणीचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचावे, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.मॅरेथॉनमध्ये २१.१ किलोमीटर, १० किलोमीटर, ५ किलोमीटर आणि ३ किलोमीटर



अशा विविध धावण्याच्या गटांचा समावेश करण्यात आला होता. तसेच ५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी १ किलोमीटर अंतराची 'किड्स स्पेशल रन' स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती. या सर्व स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने धावपटूंनी सहभाग नोंदविला. स्पर्धेतील विजेत्यांना मेडल तसेच लाखो रुपयांची रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाला आमदार विक्रांतदादा पाटील आणि मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी सौ.मोहिनी विक्रांत पाटील,नगरसेविका स्नेहल पाटील ढमाले, नगरसेवक समीर कदम, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, समाजसेवक देविदास खेडेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांचा सन्मान करण्यात आला.यावेळी अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, आज अनेक ठिकाणी महिलांना सेल्फ डिफेन्सचे प्रशिक्षण दिले जात आहे, ही चांगली बाब आहे. मात्र त्याचबरोबर प्रत्येक पुरुषाने स्त्रीचा सन्मान राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. समाजात महिलांना सुरक्षित व सन्मानाचे वातावरण मिळणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.आमदार विक्रांतदादा पाटील यांनी देशातील विविध क्षेत्रांमध्ये मातृशक्तीचे मोठे योगदान असल्याचे नमूद केले. आज शिक्षण, प्रशासन, उद्योग, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांत महिला आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. प्रत्येक स्त्री शक्ती आणि मातृशक्तीचा सन्मान करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्याचे काम आमदार विक्रांतदादा पाटील प्रतिष्ठानमार्फत सातत्याने केले जात आहे, असे त्यांनी सांगितले.या मॅरेथॉनला नागरिकांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता आगामी मान्सून काळातही 'मान्सून मॅरेथॉन'चे आयोजन करण्यात येणार असल्याचे आमदार विक्रांतदादा पाटील यांनी जाहीर केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी उपस्थित मान्यवर, प्रशासन,आणि सहभागी नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले.

# ठाण्यात महिलादिनी आरोग्य व स्वसंरक्षणार्थ जनजागरूकता

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने बोर्निओ मदर अँड चाइल्ड केअर हॉस्पिटल यांच्या वतीने निमा (छखच- थत्र) ठाणे यांच्या सहकार्याने फ्लॉवर व्हॅली कॉम्प्लेक्स येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांना प्रोत्साहन देणे हा होता. सोसायटीतील अनेक महिलांनी उत्साहाने या शिबिरात सहभाग घेत मोफत आरोग्यसेवेचा लाभ घेतला.या शिबिरामध्ये महिलांसाठी मोफत रक्तदाब (BP) व रक्तातील साखरेची (RBS)



तपासणी, मोफत स्त्रीरोग तज्ज्ञांचा सल्ला, आयुर्वेदिक सल्लामसलत तसेच आहारतज्ज्ञांचे मार्गदर्शन देण्यात आले. याशिवाय महिला दिनानिमित्त विशेष आरोग्य ऑफर जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये पॅप स्मिअर टेस्ट फक्त ४९९ मध्ये, तसेच सोनोग्राफी व लॅब तपासण्यांवर ५० टक्के सवलत देण्याची घोषणा करण्यात आली.हे शिबिर स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. वृषाली पिल्लई यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. आयुर्वेद सल्लामसलत प्राजक्ता आपटे यांनी केली. तसेच महिलांच्या आरोग्यासाठी आहार व पोषणविषयक मार्गदर्शनही देण्यात आले. महिलांमध्ये आत्मविश्वास व सुरक्षिततेची जाणीव वाढविण्यासाठी स्वसंरक्षणाविषयी जागरूकता सत्रही आयोजित करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन बोर्निओ मदर अँड चाइल्ड केअर हॉस्पिटलचे मार्केटिंग हेड उमेश कांबळे यांच्या समन्वयाने करण्यात आले. यामध्ये हॉस्पिटलच्या नर्सिंग स्टाफ, सहयोगी डॉक्टर, हाऊसकीपिंग कर्मचारी आणि मार्केटिंग टीम यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. महिलांमध्ये प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेबाबत जागरूकता वाढविणे आणि महिलांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देणे यासाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# औसा पंचायत समितीवर भाजपचा झेंडा; सभापतीपदी गंगाबाई कोदळीकर तर उपसभापतीपदी अमोल पाटील

## नवनिर्वाचित सभापती उपसभापतीचे आ.अभिमन्यू पवार यांच्याकडून सत्कार

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

औसा पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदासाठी सोमवारी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक विजय मिळवत पंचायत समितीवर आपला झेंडा फडकावला आहे. औसा पंचायत समितीच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपच्या ताब्यात सभापती आणि उपसभापती पदे गेल्याने राजकीय वर्तुळात या निकालाची मोठी चर्चा होत आहे.

सभापती पदासाठी एकूण दोन उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवार श्रीमती कोदळीकर गंगाबाई माणिकराव (थोरात) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उमेदवार पंचफुलाबाई सुधाकरराव घोडके यांच्यात



थेट लढत झाली. मतदान प्रक्रियेनंतर गंगाबाई कोदळीकर यांना एकूण १२ मते मिळाली, तर पंचफुलाबाई घोडके यांना ६ मते मिळाली. त्यामुळे पिठासीन अधिकाऱ्यांनी गंगाबाई माणिकराव कोदळीकर (थोरात) यांची औसा पंचायत समितीच्या सभापतीपदी निवड झाल्याची अधिकृत घोषणा केली.

उपसभापती पदासाठी देखील दोन उमेदवार रिंगणात होते. भारतीय जनता पार्टीचे उमेदवार अमोल साहेबराव पाटील आणि इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार किशोर देविदास जवंजाळे यांच्यात सामना झाला. या निवडणुकीत अमोल पाटील यांना १२ मते मिळाली, तर किशोर जवंजाळे यांना ६ मते मिळाली. त्यानुसार अमोल साहेबराव पाटील यांची औसा पंचायत समितीच्या उपसभापतीपदी निवड जाहीर करण्यात आली.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी नवनिर्वाचित सभापती गंगाबाई कोदळीकर आणि उपसभापती अमोल पाटील यांचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी त्यांनी औसा पंचायत समितीच्या माध्यमातून विकासकामांना अधिक गती देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले.

औसा पंचायत समितीवर भाजपचा पहिल्यांदाच ताबा मिळाल्यामुळे स्थानिक राजकारणात मोठा बदल झाल्याचे मानले जात असून, आगामी काळात पंचायत समितीच्या माध्यमातून विविध विकासकामांना चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, जिल्हा सरचिटणीस सुभाष जाधव, बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परीक्षीत पवार, माजी नगरसेवक विवेक मिश्रा , सरपंच संघटनेचे अध्यक्ष विष्णू कोळी, काकासाहेब मोरे, प्रवीण कोपरकर,रवी चिलमे, सुनिता सूर्यवंशी आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# युवा नेते श्री अरविंद पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त धनेगाव येथे रामलिंग शेरे नूतन जिल्हा परिषद सदस्य यांनी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**दैनिक वादळ वार्ता**
**वलांडी । प्रतिनिधी**

दि.९ मार्च रोजी देवणी तालुक्यातील धनेगाव येथे भाजपा युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला त्या निमित्त मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी धनेगाव येथील व आजूबाजूच्या गाव परिसरातील नागरिकांनी या शस्त्रक्रियेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेण्यात आला.भाजपा युवा नेते श्री अरविंद पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने धनेगाव येथे जिल्हा परिषद सदस्य रामलिंग शेरे यांनी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया या शिबिरात शंभर रुग्णाची तपासणी करण्यात आली यात मोतीबिंदू बाधित एकूण २९ रुग्ण रुग्णालय पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले



राजकारणात पद सत्ता आणि प्रतिष्ठा यांना मोठे महत्त्व दिले जाते अनेक जण पदासाठी धडपड करतात परंतु काही मोजकीच माणसे पदापेक्षा पक्ष आणि जनतेला,जनतेच्या हिताला प्राधान्य देतात निलंगा तालुका लातूर जिल्हा आणि मराठवाडा परिसरातील आपल्या कार्यपद्धतीने सूक्ष्म नियोजनाने आणि संघटन कौशल्याने वेगळी ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे युवा नेते अरविंदभैय्या पाटील उच्च शिक्षणासाठी प्रदेशात जाऊनही त्यांनी ग्रामीण भागाशी असलेली नाळ कधी तुटू दिली नाही शिक्षण पूर्ण करून परत आल्यानंतर त्यांनी स्वतःसाठी कोणतीही पद शोधले नाही तर पक्ष बांधणी आणि कार्यकर्त्यांना बळ देण्यावर लक्ष केंद्रित केले गेल्या पंधरा सोळा वर्षात त्यांनी सातत्याने संघटन विस्तार साठी काम केले आहे जिल्हा परिषद निवडणुकीच्या वेळी अध्यक्ष पदाची संधी उपलब्ध असताना त्यांनीही ती स्वीकारली नाही राजकीय परिस्थितीत अनुकूल असताना जिल्ह्याचे पालकमंत्री घरचेच असताना कोणतीही विरोध नसताना देखील त्यांनी पदाचा त्याग केला ही भूमिका अनेकांना आश्चर्यकारक वाटली परंतु त्यांनी सर्वसामान्य कार्यकर्त्याला पुढे आणण्याचा निर्णय घेतला त्या काळात सामान्य गरीब शेतकरी एक सामान्य माणूस म्हणजे मी रामलिंग शेरे जिल्हा परिषद सदस्य पदाची संधी मिळाली आणि जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा फडकला या घटनेने त्यांच्या मोठेपणाची आणि दूरदृष्टीची साक्ष दिली असे यावेळी नूतन जिल्हा परिषद सदस्य व भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष लातूर रामलिंग शेषराव शेरे बोलत होते यावेळी नेत्र चिकित्सक श्री पाटील सर,जनसंपर्क अधिकारी मुंडेसर,सोसायटी चेअरमन संगप्पा चरपले, तंटामुक्ती अध्यक्ष व्यंकट बिरादार, पोलीस पाटील बंकट बोयने,बालाजी बिरादार,किशोर कारभारी, किशोर बिरादार, पिंटू बोयने, संतोष बिरादार, शंकर आपटे,लक्ष्मण पवार, किशन बिरादार,नरसिंग बिरादार, प्रणव बिरादार,गावातील व आजूबाजूच्या खेड्यातील महिला,पुरुषांची व भाजप परिवार मोठ्या प्रमाणात उपस्थिती दिसत होती.

# बेमुदत आमरण उपोषणाचा पहिला दिवस



**दैनिक वादळ वार्ता**
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे हिमायतनगर तालुकाध्यक्ष वामनराव पाटील वडगावकर यांचे आज पासुन हिमायतनगर महावितरण उपविभाग कार्यालया समोर बेमुदत आमरण उपोषणला सुरुवात केली आहे. तालुक्यातील शेतकरी यांचे विविध कामे बेकायदेशीर केले आहे. पोल,डिपी,वायर तसेच अनाधिकृत डीपी बसल्यामुळे उपविभागीय अभियंता,सहाय्यक अभियंता शहरी आणि ग्रामीण यांच्यावर कायदेशीर कारवाई नझाल्यामुळे चौकशीअंती कारवाई करावी.अशी मागणी घेऊन बसले आहे.तरी तालुक्यातील शेतकरी वर्गाने या उपोषणास भेट देऊन आपल्या समस्या आणि अडीअडचणी,शेती विषयी महावितरण उपविभागाविषयी मांडण्यासाठी यावे.असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे हिमायतनगर तालुकाध्यक्ष वामनराव पाटील वडगावकर यांनी केले आहे.

# जि.प.प्रा.शाळा धानोरा (ज) येथे महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

हिमायतनगर तालुक्यातील धानोरा (ज) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि. ९ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.



यावेळी विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले, माता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर आणि रमाई यांच्या वेशभूषेत येऊन उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी महिला दिनाच्या निमित्ताने प्रेरणादायी भाषणे करून महिला सशक्तीकरणाचा संदेश दिला.

कार्यक्रमात जि.प.प्रा.शाळा धानोरा (ज) येथील मुख्याध्यापक एस. बी. सोनकांबळे यांनी आपल्या जीवनातील महिलांचे महत्त्व अधोरेखित करत महिलांच्या कर्तृत्वाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महिलांमुळेच समाजाची प्रगती आणि संस्कारांची जपणूक होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला श्री. मुखेडी एस. जी., सौ. मुसने एस. आर., खनपटे यू. एस., तसेच राज्य मराठी पत्रकार परिषद मराठवाडा विभागीय अध्यक्ष शुद्धोधन हानवते, नांदेड जिल्हा अध्यक्ष देवानंद गुंडेकर, जिल्हा उपाध्यक्ष राम चिंतलवाड, जिल्हा संघटक गंगाधर गायकवाड दिघीकर, हिमायतनगर तालुका सचिव सुभाष गुंडेकर, उपाध्यक्ष मनोज तपासकर यांच्यासह अनेक पालक वर्ग उपस्थित होता.

कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उपक्रमांमुळे महिला सन्मान आणि महिला सशक्तीकरणाचा संदेश प्रभावीपणे पोहोचला

# लॉयड्स प्रकल्पाच्या भूसंपादन पार्श्वभूमीवर येनापूर–जयरामपूर मार्ग ५ दिवस बंद

## १० ते १४ मार्चदरम्यान वाहतुकीवर तात्पुरती बंदी; आंदोलने टाळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

**दैनिक वादळ वार्ता**
**चामुर्शी । प्रतिनिधी**

आष्टी पोलीस स्टेशन हद्दीतील कोनसरी येथे सुरू असलेल्या लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या लोह प्रकल्पासाठी होणाऱ्या भूसंपादन प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर येनापूर – जयरामपूर मार्गावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्याचा आदेश जिल्हादंडाधिकारी अविश्यांत पंडा यांनी जारी केला आहे. हा आदेश १० मार्च ते १४ मार्च २०२६ या कालावधीत लागू राहणार आहे.

मौजा मुधोली चक क्रमांक २, पारडी देव (रिठ) आणि जयरामपूर येथील खाजगी तसेच शासकीय जमिनींचे मोजमाप व भूसंपादन प्रक्रिया ११ मार्चपासून सुरू होणार आहे. या प्रक्रियेदरम्यान शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होऊन आंदोलने किंवा निदर्शने होण्याची शक्यता लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

यानुसार येनापूर ते जयरामपूर या मार्गावर दोन्ही बाजूंनी सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीवर तात्पुरती बंदी राहणार आहे. मात्र प्रवासी बसेस तसेच पाणीपुरवठा, महावितरण, दूरसंचार आणि रस्ते दुरुस्ती संदर्भातील अत्यावश्यक सेवा देणाऱ्या वाहनांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

हा आदेश मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ११५ व ११६ अन्वये जारी करण्यात आला असून आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय दंड संहिता १८६० तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत कारवाई करण्याचे अधिकार स्थानिक पोलिसांना देण्यात आले आहेत.

# सास्ती गावकऱ्यांकडून धोपताला खदान मध्ये चक्का जाम


**दैनिक वादळ वार्ता**
**जिवती । प्रतिनिधी**

सास्ती आज दिनांक ०९/०३/२०२६ ला सास्ती गावा लागत असलेल्या धोपताला खदान मध्ये सास्ती गावचे उपसरपंच सचिन भाऊ कुडे, व गावकरी मिळून चक्का जाम करण्यात आले. धोपताला कोळसा खाणीला भीषण आगी मुळे सास्ती गावचे बेहाल झाले आहे मागील ५ वर्षांपासून सुरु खाजगी मलिक कडून चड्डा कंपनी कोळसा व रेती उत्खनन करीत आहे. अगदी ५०० मिटर वर असलेली कोळसा खान असल्याने सास्ती गाव वासियांचे बेहाल होत आहे. मोठा प्रमाणात जल संकट गावात आले आहे, प्रदूषण नियंत्रणात नाही, गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे श्वसनाचा त्रास गड्यांचा त्रास घरामध्ये जमा झालेला धूर त्यांच्या उडणाऱ्या बारीक बारीक कानामुळे जेवणावर सुद्धा त्याचा परिणाम होत आहे .

कंपनीकडून वारंवार खोटे आश्वासनाचे उंच उंच पहाड निर्माण होतात मागील एका वर्षात झालेल्या दोन्ही जन सुनावणी मध्ये सास्ती वासीयांना शुद्ध पेयजल देण्यात येईल, धुळी पासून सास्ती गाव वासियांना मुक्त करण्यात येईल, वर्षातून दोन ते तीनदा आरोग्य कॅम्प लावण्यात येईल, सास्ती गावात असलेल्या बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, अति तीव्र कंपनाचे झटके लागणार नाही यासाठी ब्लास्टिंग ची तीव्रता कमी करण्यात येईल, सास्ती गावात जलसाठा वाढला पाहिजे यासाठी आम्ही नियंत्रण करू, सास्ती गावचे पुनर्वसन लवकरात लवकर करून सर्वसामान्यांना त्याचा पूर्णपणे योग्य व चांगला मोबदला मिळेल अशाच प्रकारचे पुनर्वसन करू असे खोटे आश्वासन कंपनीकडून वारंवार देण्यात येत आहे.

आज पर्यंत कंपनीकडून जे जे आश्वासन देण्यात आले ते एक पण पूर्ण करण्यात आलेलं नाही मागील तीन वर्षापासून सत्तेत आल्यापासून वारंवार पत्रव्यवहार करून सुद्धा एजीएम ऑफिस बल्लारपूर, तहसील ऑफिस, राजुरा जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर तसेच पालकमंत्री यांनासुद्धा सास्ती गावातील भीषण समस्याचे आठवण करून देण्यात आली . परंतु आज तोवर सास्ती गावाच्या समस्या संदर्भात कुणाचेही जातीयता लक्ष नाही.

मागील तीन दिवसापासून जळणाऱ्या कोळसामुळे जास्ती गावचे बेहाल झाले यालाच कंटाळून आज दिनांक ९ मार्च २०२६ ला सर्व संपूर्ण गाव पुरुष लहान मुलं व महिलांच्या अगुवाई मध्ये धोपताला खदान मध्ये महिलांकडून चक्काजाम करण्यात आला. धोपताला खदान चे खान प्रबंधक योगेंद्र कुमार सिंग, सुरक्षा अधिकारी पृथ्वी राजू सरस्वती, चड्ड्या कंपनी इन्चार्ज रोहित सिंग यांच्या उपस्थितीत सास्ती गावात येणाऱ्या तीन दिवसात सास्ती गावातील असलेल्या समस्येचे वरच्या पातळीवर निराकरण करू असे फोन द्वारे आज उपक्षेत्रीय प्रबंधक जी व्ही एस प्रसाद साहेब यांनी आश्वासन दिले. जर हे आस्वासन पूर्ण न झाल्यास संपूर्ण खदान चे काम बंद करण्यात येईल व जिथपर्यंत त्याचा तोडगा निघणार नाही तोपर्यंत खदान चालू देणार नाही असे चेतावणी गावकऱ्यांच्या वतीने उपस्थित खान प्रबंधक यांना देण्यात आले. या चक्काजाम मध्ये सास्ती गावचे ग्रामपंचायत सदस्य मधुकर झाडे दिलीप नरड आनंद मांडवकर सुमन जंगलीवार, रुपेश शेंडे,वेणूपतिवार, चंदू नळे,मुकेश वैरागडे, नवीन कोतले,प्रशांत जुल्मे गोपाल पिंपळशेडे,राहुल टीका, प्रमोद कष्टी, पंडा पेटकर,लकी अब्बा,महेंद्र पेरका,ऋषभ पामला, लखन जंगलीवार,रोहन कोतले, महेंद्र कोरम, बंटी कोतले,नितेश चेतूलवार,राहुल पत्ती,अनिल खवसे, करन चतुरवार, पद्मा कोतले, स्वप्ना बंडा, सुलचना रामगिरवार, बिषनुबाई, शिला नरड, अरुणा नरड, कल्पना पत्ती, लक्ष्मी अब्बा, निखिता पत्ती, रेणुका पेंडापल्ली, रोना गज्जमावर, राधा बोनकूर





# शेतकरी,बेरोजगारी अन् बीडच्या विकासावर खा.सोनवणेंनी संसदेत उठविला आवाज

## लोकसभा अध्यक्षाविरूध्द आलेल्या अविश्वास ठरावाच्या समर्थनार्थही केले मुद्देसूद भाषण




दैनिक वादळ वार्ता
**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील वाढते कृषी संकट, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, प्रादेशिक विकासातील असमतोल तसेच बीड जिल्ह्यातील अपूर्ण पायाभूत सुविधा या विविध मुद्द्यांवर खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत आवाज उठवला. लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधींना त्यांच्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याचा पूर्ण अधिकार असला पाहिजे, असे सांगत त्यांनी सभागृहात अनेक गंभीर विषयांवर त्यांनी सरकारला धारेवर धरले. दरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या विरूध्द असलेल्या अविश्वास ठरावाच्या समर्थनार्थ खा.सोनवणे यांनी मुद्देसूद भाषण करून देशाचे लक्ष वेधले.

दिल्ली येथे संसदेतचे बजेट अधिवेशन सुरू आहे. सभागृहात बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी सोनवणे यांनी महाराष्ट्रातील कृषी संकटाची तीव्रता अधोरेखित केली. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार देशातील शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. उत्पादन खर्च वाढत असताना पिकांना योग्य बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत असल्याचे त्यांनी सांगितले. यावर उपाय म्हणून किमान आधारभूत किंमत प्रभावीपणे लागू करणे, पीक विमा योजना मजबूत करणे आणि सिंचनाचा विस्तार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बीड जिल्ह्याच्या संदर्भात बोलताना सोनवणे यांनी रेल्वे कनेक्टिव्हिटी, राष्ट्रीय महामार्ग आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्प वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याची बाब मांडली. या प्रकल्पांच्या विलंबामुळे आर्थिक विकास आणि रोजगाराच्या संधींवर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जलजीवन मिशनच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींमुळे मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या कायम असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. लोकशाहीत लोकप्रतिनिधींना लोकांच्या समस्या मांडण्याचा अधिकार सुरक्षित राहिला पाहिजे, असे सांगत सरकारने शेतकरी, ग्रामीण विकास आणि प्रादेशिक समतोल विकासासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

### बिर्लांच्या भुमिकेला टेबल फॅनचे उदाहरण

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला कायम पक्षपाती भुमिका निभावत आहेत. ते टेबलफॅनसारखे वागत असून उजव्या बाजूला सत्ताधाऱ्यांकडून बघून हसतात तर डावीकडे (विरोधक) बघून प्रश्न विचारणाऱ्या लोकप्रतिनधींना खाली बसा असे सांगतात. त्यांची हि भुमिका योग्य नसून याच कारणाने आता अविश्वास ठराव आलेला आहे, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

### राष्ट्रवादीने दिली मोठी संधी

राष्ट्रवादी (शरद पवार गट)च्या वतीने अविश्वास ठराव्याच्या समर्थनार्थ बोलण्याची संधी खा.बजरंग सोनवणे यांना देण्यात आली होती. पक्षाच्या वतीने ही जबाबदारी खा.सोनवणे यांच्यावर दिली होती़खा.बजरंग सोनवणे हे कायम सामान्य माणसाचे प्रश्न संसदेत मांडत आलेले आहेत. याच कारणाने ही मोठी जबाबदारी देखील पक्षाने त्यांच्यावर दिली होती.

### प्रकल्प स्थलांतराचा मुद्दा मांडला

औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्रातून मोठ्या गुंतवणुकीचे प्रकल्प इतर राज्यांकडे वळाल्याबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली. मोठ्या उद्योगांमुळे रोजगारनिर्मिती होऊ शकली असती, मात्र प्रकल्प स्थलांतरित झाल्याने राज्यातील रोजगाराच्या संधींवर परिणाम झाला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वाढत्या ऑटोमेशनमुळे रोजगारविहीन वाढ होत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

### सिंचनात मराठवाडा मागे

खा.सोनवणे यांनी महाराष्ट्रातील प्रादेशिक विकासातील असंतुलनावरही भाष्य केले. पश्चिम महाराष्ट्रात सिंचन व औद्योगिक विकास झालेला असताना विदर्भ व मराठवाडा अजूनही मागे असल्याचे त्यांनी नमूद केले. या भागांमध्ये उद्योग, पायाभूत सुविधा आणि रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी विशेष धोरणांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

### पीक विम्यातील अडचणींचा वाचला पाढा

याशिवाय कापूस व सोयाबीनसारख्या पिकांवर आंतरराष्ट्रीय व्यापार करारांचा होणारा परिणाम, आयात वाढल्यास देशांतर्गत बाजारपेठ कमकुवत होण्याची शक्यता आणि कांद्याच्या किमतीतील अस्थिरतेमुळे शेतकऱ्यांना होणारे नुकसान या मुद्द्यांकडेही त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. तसेच शेतकऱ्यांच्या कर्जमाफिची गरज, पीक विमा योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी आणि सहकारी बँकांमधील ठेवीदारांच्या सुरक्षेबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले.



राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे केज तालुका अल्पसंख्याक अध्यक्ष श्री गौसमुद्दीन इनामदार सर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना मा. नगरसेवक कपिल मस्के, दैनिक वादळ वार्ता चे संपादक अजय भांगे ,सामाजिक कार्यकर्ते सुदेश दादा सिरसट व शेखर सिरसट

# बीड येथे सनदी लेखापाल,प्रमाणित लेखा परीक्षक प्रशिक्षण वर्ग संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म.पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर मा.विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथे जिल्ह्यातील सहकार विभागाचे पॅनेल वरील सनदी लेखापाल, प्रमाणित लेखा परीक्षक सहकारी संस्था यांच्या करीता दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा उप निबंधक सतीश तोटावर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून करण्यात आले.यावेळी बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्यवस्थापक आर.व्ही. उबाळे यांची उपस्थिती होती.दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात जिल्हा उपनिबंधक श्री.सतीश तोटावर,आदेश नहार, सनदी लेखापाल बीड सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर चे प्राचार्य बी.जे. ठोंबरे,उप प्राचार्य एस. आर.कोळे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.समारोप प्रसंगी श्री.शिवराज नेहरकर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था केज यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्र संचलन आभार प्रदर्शन वर्ग संयोजक एस.आर.कोळे उप प्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांनी केले.



# जिजाऊ ज्ञानमंदिरात जागतिक महिलादिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड येथील निसर्गसुंदर शाळा जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूलमध्ये सोमवारी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक ज्ञानोबा जोगदंड सर यांच्या मातोश्री श्रीमती कौतुकबाई जोगदंड , तर प्रमुख उपस्थितीत सौ. शकुंतला जोगदंड , मुख्याध्यापक जगदिप जोगदंड , शितल जोगदंड , पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड आदीसह शिक्षक , शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी बहुसंख्येनी उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पुजा करण्यात आली.




कार्यक्रमाचे औचित्य साधून संचालक ज्ञानोबा जोगदंड सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून बोलताना म्हणाले की, 'भारतीय इतिहासातील कर्तबगार महिला राजमाता जिजाऊ मासाहेब , क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर , अहिल्याबाई होळकर , हिरकणी , कल्पना चावला , इंदिरा गांधी , अशा असंख्य महिलांनी विविध क्षेत्रात आपली कर्तबगारी दाखवून आपला एक वेगळा ठसा उमटवला आहे. त्या महान स्त्रिया आजही त्यांच्या अव्दितीय कार्यामुळे अजरामर आहेत. यावेळी शाळेच्यावतीने महिलाशिक्षिका व शिक्षेकेतर महिला कर्मचाऱ्यांचा फेटा बांधून , डायरी , लेखणी सस्नेह भेटीसह ,पुष्पहार देऊन , पेढा भरवून महिलादिना निमित्त सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. सरिता जोशी मॅडम यांनी केले . तर सौ. शकुंतला गीते मॅडम यांनी बहारदार असे सूत्रसंचलन केले. कार्यक्रमाचे फोटोशेषण सचिन सुर्यवंशी व संजय चौडेकर यांनी केले.

# सय्यद शरिफभाई यांच्या वतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत ड्रेस वाटप



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दु शाळा, अजिजपुरा मोहल्ला केज येथील उर्दू शाळेत शिकणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते श्री.सय्यद शरिफभाई यांच्या वतीने रमजान महिन्यातील पवित्र रमजान ईद साजरी करण्यात यावी या उद्देशाने येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कपडे वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमास प्रमुख उपस्थितीत सय्यद शरिफभाई,सेवा निवृत्त मुख्याध्यापक अमजद सर,जेष्ठ पत्रकार मजहर भाई शेख,संपादक खतीब मुब्बशिरोद्दीन, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष खुरेशी ताहेरभाई,जेष्ठ नागरिक सय्यद अहेमदभाई,जेष्ठ शिक्षक खतीब मियांभाई सर,तसेच शाळेतील शिक्षक खतीब अफजलोद्दीन सर, फारोखी कामथाने सर, मोहम्मद इलियास सर, अन्सार शहा सर,श्रीमती दाईमी मॅडम आदि उपस्थित होते.

# चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर भाजपकडून मोठी जबाबदारी

## ओडिशा राज्यसभा निवडणुकीसाठी दिली केंद्रीय पर्यवेक्षकपदाची धुरा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ओडिशा राज्यात १६ मार्च रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची केंद्रीय पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून ही जबाबदारी देण्यात आली असून पक्षाच्या निवडणूक व्यवस्थापनात त्यांची महत्त्वाची भूमिका असणार आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. राज्यसभेच्या निवडणुकीत पक्षाची रणनीती प्रभावीपणे राबवण्यासाठी अनुभवी नेत्यांवर जबाबदारी सोपवण्यात येत असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले आहे.या नियुक्तीनंतर चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले. ही महत्त्वाची जबाबदारी दिल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांचे विशेष आभार व्यक्त केले. पक्षाने दाखवलेल्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी आपण पूर्ण प्रामाणिकपणे काम करू, असेही त्यांनी स्पष्ट केले. संघटनात्मक शिस्त पाळत आणि पक्षाच्या मार्गदर्शनानुसार ही जबाबदारी पार पाडू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, केवळ ओडिशाच नव्हे तर इतर राज्यांमध्येही राज्यसभा



निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून केंद्रीय पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. बिहारमध्ये दोन नेत्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा आणि केंद्रीय राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांची बिहारसाठी निवडणूक पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या माध्यमातून पक्षाने विविध राज्यांमध्ये निवडणूक प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.याशिवाय हरियाणातही भाजपने स्वतंत्र पर्यवेक्षक नेमले आहेत. गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष सांगवी यांना हरियाणा राज्यसभा निवडणुकीसाठी केंद्रीय पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. आगामी राज्यसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने देशातील विविध राज्यांमध्ये अनुभवी नेत्यांवर जबाबदाऱ्या सोपवून संघटनात्मक तयारी अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या नियुक्त्यांमुळे निवडणूक व्यवस्थापनात पक्ष अधिक सक्रिय झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077